## नियमित दिवाणी दावा क्र. ६६/२०११ मध्ये नि. क्र. ४५ खालील आदेश
## (सुरेश व इतर वि. पांडूरंग व इतर)

प्रतिवादींतर्फे प्रस्तुतचा अर्ज त्यांचेविरुद्ध वादी व वादीतर्फे साक्षीदारांचे 'उलटतपास नाही' असा झालेला आदेश रद्दबातल होऊन मिळण्याकरिता दाखल केला आहे. वादींतर्फे प्रस्तुत अर्जाचे पाठीमागील बाजूसच त्यांचे म्हणणे दाखल केले आहे.

२) प्रस्तुत प्रतिवादींचे थोडक्यात कथन असे की, प्रस्तुत प्रकरणात प्रतिवादींनी कैफियत व म्हणणे दाखल केले आहे. प्रतिवादी हे पोट भरण्याकामी व ऊसतोडणीकरिता परजिल्ह्यात गेले असल्याने त्यांना वकिलांना महत्त्वाची कागदपत्रे व माहिती वेळेत देता आले नाही. मे. न्यायालयाने नेमलेले तारखेस वादी व वादीतर्फे साक्षीदार यांचे वेळेत उलटतपास घेण्यात आले नसल्याने त्यांचेविरुद्ध उलटतपास नाहीचा आदेश पारित केला आहे. प्रतिवादी हे अशिक्षित असून त्यांना कायद्याचे ज्ञान नाही. जत तालुका दुष्काळग्रस्त भाग असल्याने प्रतिवादींना मिळेल तेथे मजुरीकामाकरिता जावे लागते. प्रस्तुत प्रकरणात वादी व वादीतर्फे साक्षीदार यांचा प्रतिवादींकडून उलटतपास घेतल्यास व अभिलेखावर आल्यास वादी यांचे काडीमात्र देखील नुकसान होणार नाही. याउलट प्रतिवादींनी वादी व वादींतर्फे साक्षीदार यांचे उलटतपास न घेतल्यास त्यांचे कशातही न मोजता येणारे असे नुकसान होणार आहे. तसेच प्रतिवादी नैसर्गिक न्यायदानापासून वंचित राहणार आहेत. या सर्व कारणावरून प्रतिवादींविरुद्ध उलटतपास नाहीचा आदेश रद्द होऊन उलटतपास घेण्यास परवानगी देण्यात यावी अशी विनंती प्रतिवादींतर्फे करण्यात आली आहे.

३) वादींनी प्रस्तुत अर्जास म्हणणे दाखल करून अर्ज मंजुरीस विरोध

दर्शविलेला आहे. सदर कामी वादींनी दावा दाखल केलेवर प्रतिवादींना नोटीस बजावणी होऊनही ते हजर न झाल्याने त्यांच्याविरुद्ध एकतर्फा आदेश झाला. त्यानंतर प्रतिवादींतर्फे वकील हजर झाले व म्हणणे दिले. त्यानंतर वादी क्र. १ याचे सरतपासाचे शपथपत्र दिले असता प्रतिवादींचे वकिलांना वादी क्र. १ यांचे उलटतपास घेण्यास वेळ घालवला म्हणून वादी क्र. १ चा देखील उलटतपास नाही असा आदेश झाला. वादींनी दिलेल्या दोन्ही साक्षीदारांचे कित्येक वेळेस उलटतपासाची संधी असूनही प्रतिवादींच्या वकिलांनी जाणूनबुजून वेळकाढूपणा केल्याने साक्षीदार क्र. २ व ३ यांचेदेखील उलटतपास नाही असा आदेश झाला. दावा २०११ मधील असून प्रतिवादींनी जाणूनबुजून विलंब करण्याचा प्रयत्न करत आहेत. सबब, सदरचा अर्ज जास्तीत जास्त खर्चासह नामंजूर करून वादींच्या वतीने आदेश व्हावेत.

४) अर्ज व त्यावरील म्हणणे वाचले. संचिकेचे व सोबतच्या कागदपत्रांचे अवलोकन केले. उभय पक्षकारांतर्फे विधिज्ञांचा युक्तिवाद ऐकला.

५) प्रकरण संचिकेचे अवलोकन केले असता वादी क्र. १ चे सरतपासाचे शपथपत्र निशाणी क्र. २६ दि. २३/११/२०१७ रोजी दाखल करण्यात आला. त्यानंतर दि. २८/११/२०१८ रोजी निशाणी क्र. २६ खाली प्रतिवादींचा उलटतपास नाही असा आदेश पारित करण्यात आला होता. त्यानंतर प्रतिवादींनी निशाणी क्र. ३६ कडे अर्ज देऊन प्रस्तुतचा उलटतपास नाहीचा आदेश रद्द करून वादी क्र. १ चा उलटतपास दि. १९/११/२०१९ रोजी थोडा नोंदविला व पुढील उलटतपासासाठी प्रकरण तहकूब करण्यात आले. त्यानंतर प्रतिवादी हे वादी क्र. १ चे उलटतपास घेण्यासाठी सतत गैरहजर असल्याने प्रतिवादींविरुद्ध पुन्हा एकदा निशाणी क्र. २६ खाली दि. २२/०२/२०२१ रोजी उलटतपास नाही असा आदेश पारित करण्यात आला. त्यानंतर वादींतर्फे साक्षीदार क्र. २ साहेबराव टोणे याचे सरतपासाचे शपथपत्र

निशाणी क्र. ३८ वर व साक्षीदार क्र. ३ श्री. निवृत्ती नरळे याचे सरतपासाचे शपथपत्र निशाणी क्र. ३९ वर दाखल करण्यात आले. परंतु प्रतिवादी सदर साक्षीदारांचेही उलटतपास घेण्यास गैरहजर राहिल्याने दि. ०४/०४/२०२४ रोजी त्यांचेविरुद्ध सदर साक्षीदारांचे "उलटतपास नाही" चा आदेश पारित करण्यात आला असल्याचे दिसून येते.

६) प्रस्तुत अर्जाचे अवलोकन केले असता त्यामध्ये नमूद करण्यात आलेली कारणे ही प्रकरणातील तथ्यांचा विचार केला असता अजिबातच संयुक्तिक नाहीत असे नसून ती न्यायाच्या उद्देशाने विचारात घेण्यासारखी आहेत. त्याचबरोबर, दाव्यातील वादविषय लक्षात घेतला असता उभय पक्षकारांना प्रकरणाच्या गुणदोषावर निर्णयासाठी त्यांचा पुरावा देण्याची संधी देणे न्याय प्रक्रियेस अभिप्रेत आहे. नैसर्गिक न्यायतत्त्वाआधारेही प्रतिवादींना वादी क्र. १ व वादींतर्फे वर नमूद साक्षीदार क्र. २ व ३ यांचे उलटतपास घेण्याची परवानगी देणे जरुरीचे वाटते. तसे न केल्यास प्रकरणामध्ये गुंतागुंत निर्माण होऊन प्रकरणांची अनेकता होण्याची दाट शक्यता आहे. तथापि, त्याच वेळी प्रस्तुत प्रतिवादींनी उलटतपासासाठी केलेल्या विलंबाबाबत वादींना खर्चाची रक्कम देण्याचे आदेशीत करणे देखील जरुरीचे आहे. प्रस्तुत प्रकरणातील झालेल्या विलंबाचा सारासार विचार केला असता वादींनी प्रतिवादींना खर्चाची एकूण रक्कम रु. ६००/- देण्याचे आदेशीत केल्यास या प्रकरणात न्यायोचित समतोल साधला जाईल असे माझे मत आहे. या सर्व बाबींचा विचार करता मी खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

१. प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी यांनी वादींना एकूण खर्चाची रक्कम रु. ६००/- देण्याच्या अटीवर मंजूर करण्यात येत आहे.

२. प्रतिवादी यांनी वादींना वर नमूद खर्चाची रक्कम अदा केल्यानंतर त्यांचेविरुद्ध निशाणी क्र. २६ खाली दि. २२/०२/२०२१ रोजी, निशाणी क्र. ३८ व ३९ खाली दि. ०४/०४/२०२४ रोजी उलटतपास नाही असा पारित करण्यात आलेला आदेश रद्दबातल करण्यात यावा व प्रतिवादींना वर नमूद वादी क्र. १ व वादींतर्फे साक्षीदार क्र. २ व ३ यांचे उलटतपास घेण्याची परवानगी देण्यात यावी.

३. आनुषंगिक आदेश निशाणी क्र. २६, ३८ व ३९ वर पारित करण्यात यावा.

PRAKASH CHUNNI BACHHALE

Digitally signed by PRAKASH CHUNNI BACHHALE
Date: 2024.07.03 17:04:28 +0530

स्थळ:– जत (प्रकाश सी. बछले)

दि. ०३/०७/२०२४ दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, जत

**<u>प्रमाणपत्र</u>**

मी असे प्रमाणित करतो की, या पी.डी.एफ. फाईलमधील मजकूर व मूळ आदेशामधील मजकूर हा एकसारखा आहे.

| | |
|---|---|
| स्टेनोग्राफरचे नांव | श्री. एस. ए. जमादार<br>(लघुलेखक श्रेणी–III) |
| कोर्टाचे नांव | श्री. प्रकाश सी. बछले,<br>दिवाणी न्यायाधीश क.स्तर व प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, जत. |
| दिनांक | ०३/०७/२०२४ |
| पीठासीन अधिकारी यांनी सही केलेली तारीख | ०३/०७/२०२४ |
| आदेश अपलोड केलेली तारीख | ०३/०७/२०२४ |